CNR : MHNS110043862021

**नि. दिवाणी दावा क्र.३४८/२०२१**
*आशाबाई संजय खुर्दे/४.*
*विरुध्द*
*श्री. नेताजी नामदेव खुर्दे.*

**<u>निशाणी क्र.१८ खालील आदेश</u>**
( *पारीत दिनांक २१/०८/२०२३* )

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता (थोडक्यात सि.पी.सी.) चे आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनरचे नियुक्तीकरीता सादर केला आहे.

२) वादीचे थोडक्यात म्हणणे येणेप्रमाणे :

दावा मिळकतीचे चारही बाजुने बांध व बांधाच्या खुणा कायम करुन मिळण्यासाठी तालुका निरीक्षक, भुमिअभिलेख यांचेकडील तज्ञ मोजणीदार यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक होवून दाव्यातील गट क्र.६०१/१ ते ६०१/४ या मिळकतींची पोट हिश्याची मोजणी व्हावी यासाठी प्रस्तुत दावा वादीने दाखल केलेला आहे. वाटपानुसार वादी यांना गट क्र.६०१/१ ते ६०१/४ या मिळकती आलेल्या आहेत. तसेच प्रतिवादी यांना गट क्र.६०२ ही मिळकत आलेली आहे. वादी व प्रतिवादी यांचे जमिनीदरम्यान पोट हिस्से मोजुन टाकलेले नाहीत. बांधावरुन वादी व प्रतिवादी यांच्यात वाद होत राहतो. त्यामुळे योग्य ती परिस्थिती न्यायालयासमक्ष आल्याशिवाय प्रस्तुत दाव्याचा निकाल गुणवत्तेवर होणार नाही. त्यामुळे दावा कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीची कोर्ट कमिशनर मार्फत मोजणी होणेबाबत प्रस्तुत अर्ज सादर केलेला आहे.

३) प्रस्तुत अर्जाला दि.२०/१२/२०२२ पासुन प्रतिवादी यांनी म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे दि.०८/०६/२०२३ चे आदेशानुसार

प्रस्तुत अर्ज प्रतिवादीचे म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आला.

४) वादीचा दावा हा मोजणीसाठी व निरंतर मनाई हुकूमासाठीचा आहे. वादी व प्रतिवादीदरम्यान बांध व बांधाच्या खुणा याबाबत वाद आहे. तसेच प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचासुध्दा वादीचा आक्षेप आहे. सबब अशा दाव्यात दि.प्र.सं.चे आदेश २६ नियम ९ नुसार उपअधिक्षक भुमिअभिलेख, निफाड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करुन वादग्रस्त शेतांची संयुक्त मोजणी करुन तसा अहवाल न्यायालयासमक्ष येणे दाव्याचे अंतिम निकालासाठी आवश्यक आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो व खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**-: <u>आदेश</u> :-**

१) निशाणी क्र.१८ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) दावा कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकती गट क्र. ६०१/१ ते ६०१/४ तथा गट क्र.६०२ मौजे टाकळी विंचुर, ता. निफाड, जि. नाशिक यांची संयुक्त मोजणी करणेबाबत तालुका अधिक्षक, भुमिअभिलेख, निफाड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यात येते.

३) तालुका अधिक्षक, भुमिअभिलेख, निफाड यांनी वर नमूद गटांची संयुक्त मोजणी करुन गट क्र.६०१/१ ते ६०१/४ यांचे पोट हिस्से, बांध, बांधाच्या खुणा कायम कराव्या, तसेच गट क्र.६०२ चे ६०१/१ ते ६०१/४ मध्ये अतिक्रमण असल्यास त्याबाबतचीसुध्दा स्पष्ट नोंद

करुन तसा अहवाल रिट मिळाल्यापासुन दोन महिन्यांत सादर करावा.

४) सदर मोजणीबाबत वादी, प्रतिवादी यांनी गट क्र. ६०१/१ ते ६०१/४ व ६०२ च्या धारकांनी मोजणीकरीता आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करावी. वादींनी मोजणीची फी सोसावी.

५) येणेप्रमाणे रिट जारी करण्यात यावी.

JITENDRAKUMAR V BHENDE

Digitally signed by JITENDRAKUMAR V BHENDE
Date: 2023.08.24 17:45:08 +0530

**( जे. व्ही. भेंडे )**
३रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
निफाड

ठिकाण : निफाड
दिनांक : २१/०८/२०२३

पीडीएफ नस्तीचे आदेशातील प्रत्येक शब्द हा मुळ निकालपत्रातील मजकुराशी जुळणारा व सुसंगत आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | श्री जे. व्ही. भेंडे,<br>३रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर<br>व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, निफाड,<br>ता. निफाड, जिल्हा नाशिक. |
| लघुलेखन/टंकलेखन दिल्याचा दिनांक | : | २१/०८/२०२३ |
| लिप्यंतराचा/टंकलेखनाचा दिनांक | : | २१/०८/२०२३ |
| पिठासन अधिकारी यांनी तपासणी केल्याचा दिनांक | : | २१/०८/२०२३ |
| पिठासन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांक | : | २१/०८/२०२३ |